महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

# महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित

## परिमंडल कार्यालयांची जाहिरात क्र. १/२०१६ व मुख्य कार्यालयाची जाहिरात क्र. ०३/२०१६ अंतर्गत निम्नस्तर लिपिक (लेखा) पदावर नेमणूक करण्यासाठी तात्पुरती निवड करण्यात आलेल्या उमेदवारांच्या कागदपत्रांची पडताळणी करण्याबाबत.

**संदर्भ :** दि.०६.१२.२०१६ रोजी परिमंडल निहाय प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड /प्रतिक्षा यादया.

महापारेषण कंपनीच्या विविध परिमंडल कार्यालयांनी प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०१/२०१६ व मुख्य कार्यालयाने प्रसारित केलेल्या जाहिरात क्र.०३/२०१६ अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) या पदांसाठी दि. ०६.१२.२०१६ च्या सूचनापत्रांद्वारे प्रसिध्द करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवड / प्रतिक्षा याद्यांमधील उमेदवारांना सदर सूचना पत्रामधील अटी व शर्तीच्या अधीन राहून मूळ कागदपत्रांच्या पडताळणीकरिता बोलविण्यात येत आहे.

२. त्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, सदरहू सुचना पत्रात नमूद केलेल्या **परिमंडल निहाय तात्पुरत्या निवड सूचीतील उमेदवारांनी दि.२७.१२.२०१६ व २८.१२.२०१६ रोजी परिमंडल कार्यालयात** खाली नमूद केलेले **मूळ कागदपत्र** व **त्यांच्या साक्षांकीत छाया प्रतींच्या एक संचासह** कार्यालयीन वेळेत हजर राहून कागदपत्रांची पडताळणी करून घेणे आवश्यक आहे.

- **मान्यताप्राप्त विद्यापीठ / संस्था यांचेकडील पदवी किंवा तत्सम मान्यताप्राप्त शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र.**
- **MSCIT किंवा जाहिरातीत प्रसिध्द करण्यात आलेले कोणतेही एक संगणक अर्हता प्रमाणपत्र.**
- **जन्मतारीखेकरीता एस.एस.सी. प्रमाणपत्र / शाळा सोडल्याचा दाखला.**
- **जातीचा दाखला ( मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास )**
- **जाती वैधता प्रमाणपत्र ( असल्यास - मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास )**
- **नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र, ( मागास प्रवर्गातून अर्ज केल्यास )**
- **अधिवास प्रमाणपत्र**
- **मराठी भाषा प्रमाणपत्र (जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे)**
- **नावातील बदलाचे प्रमाणपत्र (बदल केला असल्यास)**
- **ॲप्रेंटीसशीप प्रमाणपत्र (ॲप्रेंटीसशीपबद्दल अर्जात उल्लेख केला असल्यास)**

३. कागदपत्र पड़ताळणीस हजर राहण्याबाबत प्रत्येक उमेदवारास त्याने ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्यावर पत्र पाठविण्यात येत आहे. पत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची पोच ई-मेलद्वारे देण्यात यावी. तसेच, उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या मोबाईलवर संदेशाद्वारे सुध्दा कळविण्यात येत आहे. सदर संदेश मिळाल्याचा प्रती संदेश/ पोच कळवावी.

४. जर सदर पडताळणी करिता उमेदवार हजर न राहिल्यास सदर उमेदवार निवडी करिता पात्र समजला जाणार नाही याची कृपया गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

**५. कागदपत्र पडताळणीकरीता उमेदवारास बोलाविण्यात आले म्हणून त्यांना नेमणूक मिळण्याबाबतचा कोणत्याही प्रकारचा हक्क प्राप्त होत नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.**

**६. तात्पुरत्या प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना संबंधित परिमंडल कार्यालयाकडून आवश्यकता असल्यास सुचित केले जाईल. त्यामुळे त्यांनी परिमंडल कार्यालय किंवा मुख्य कार्यालयास संपर्क करू नये.**

**दिनांक:- २१.१२.२०१६** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*************